CMYK

**पाणीपुरवठा विभागाच्या कुंभकर्णी झोपेमुळे जांब आढाव येथे भीषण पाणीटंचाई**
>> पान 2

**ज्येष्ठ नेत्याला अशी उपमा देणे अयोग्य**
>> पान 3

**सैनिक सुनील नागरे यांचा अपघाती मृत्यू**
>> पान 4

**सुविचार**
आपले निर्णय आपल्या स्वप्नांच्या आधारावर घ्या.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 261 ■ मंगळवार, दि. 06 मे 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**या घटनेमुळे संपूर्ण देश एक झाला आहे, पहलगाम हल्ल्यावर नवाजुद्दीनने व्यक्त केले दुःख**
आतील पान

# बारावीचा निकाल जाहीर; राज्याचा निकाल ९१.८८ टक्के

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी : महाराष्ट्र बोर्डाचा बारावीचा निकाल कधी जाहीर होणार, याकडं विद्यार्थी आणि पालकांचं लक्ष लागलं होतं. विद्यार्थी आणि पालकांची प्रतीक्षा आज संपली आहे. आज बोर्डाकडून बारावीच्या निकाल जाहीर करण्यात आलेला आहे. आज ५ मे २०२५ (सोमवारी) बारावीचा निकाल जाहीर करण्यात आला. आज अकरा वाजता महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत बोर्डाकडून निकाल जाहीर करण्यात आला आहे.**

पत्रकार परिषदेत महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्षांनी शरद गोसावी यांनी निकाल जाहीर केला. महाराष्ट्राचा १२ वीचा निकाल ९१.८८ टक्के लागला आहे. यात पुणे विभागाचा निकाल ९१.३२ टक्के निकाल लागला आहे. तर कोल्हापूरचा निकाल ९३.६४ टक्के लागला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निकाल जाहीर केला. राज्याचा बारावीच्या निकाल ९१.८८ टक्के निकाल लागला आहे. >> पान २



## बारावीचा अभ्यासक्रम बदलणार, निकालाचा टक्का घसरला, १२४ केंद्रावर गैरप्रकार

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र बोर्डाचा बारावीचा निकाल आज (सोमवारी, ता-५) जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्षांनी शरद गोसावी यांनी पत्रकार परिषद घेऊन निकाल जाहीर केला. विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजता वेबसाईटवर निकाला पाहता येणार आहेत. सध्या पत्रकार परिषदेत बोर्डाकडून विभागनिहाय आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेमध्ये शरद गोसावी यांनी अनेक गोष्टींवरती भाष्य केलं आहे. यावेळी त्यांनी  निकालाचा टक्का यावेळी १.४९ टक्क्यांनी कमी झाल्याची माहिती दिली आहे. त्याचबरोबर २०२७-२८ मध्ये बारावीचा नवीन अभ्यासक्रम येणार अशी माहिती त्यांनी यावेळी दिली आहे. या परिक्षेमध्ये गैरप्रकार रोखण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यात आल्या होत्या, मात्र, तरी देखील १२४ केंद्रावर गैरप्रकार झाले आहेत त्याची तपासणी त्रुटी आढळल्यास ते परिक्षा केंद्र कायमस्वरूपी बंद करणार असल्याची माहिती शरद गोसावी यांनी दिली आहे.

## अतिरेक्यांना कथित अन्न-निवारा पुरविणाऱ्या व्यक्तीचा नदीत बुडून मृत्यू; कुटुंबाने लष्करावर केले आरोप



श्रीनगर : पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील अतिरेक्यांना अन्न आणि निवारा पुरविल्याप्रकरणी २३ वर्षीय इम्तियाज अहमद मागरे या तरूणास सुरक्षा यंत्रणांनी ताब्यात घेतले होते. मात्र सुरक्षा दलापासून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी त्याने नदीत उडी मारली. उडी मारल्यानंतर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे इम्तियाज मागरे पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत गेल्याचे स्पष्ट दिसत आहे.

शनिवारी जम्मू-काश्मीर पोलिसांनी मागरेला ताब्यात घेतले होते. चौकशीदरम्यान त्याने सांगितले की, तो कुलगाम जिल्ह्याच्या तंगमार्ग येथील जगंलात लपलेल्या अतिरेक्यांना अन्न आणि इतर रसद पुरवत होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने सुरक्षा दलांना अतिरेकी लपलेल्या ठिकाणी नेण्याचे मान्य केले होते. पण घटनास्थळी गेल्यानंतर त्याने नदीत उडी घेतली.

सुरक्षा यंत्रणांनी ताब्यात घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मागरेचा ओढ्यात मतृदेह आढळला. यानंतर मागरेचे कुटुंबिय आणि नॅशनल कॉन्फरन्स आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या नेत्यांनी या प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली आहे. इम्तियाज मागरे याचा कोठडीत मृत्यू झाला असावा, असा आरोप त्याच्या कुटुंबियांनी व्यक्त केला आहे.

राज्याच्या आरोग्य आणि शिक्षण मंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्या सकिना इटू यांनी रविवारी मागरेच्या कुटुंबियांची भेट घेतली आणि त्यांनी या मृत्यूचा तपास व्हावा अशी मागणी केली. सकिना इटू म्हणाल्या, ''राज्यात भीतीचे वातावरण निमर्ण झाले असून हे दुर्दैवी आहे. मी नायब राज्यपालांना विनंती करते की, त्यांनी या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी. इम्तियाज अहमाद यांना त्यांच्या घरातून नेण्यात आले आणि आज त्यांचा मृतदेह सापडला.''

पीडीपी पक्षाच्या अध्यक्षा मेहमूबबा मुफ्ती, नॅशनल कॉन्फरन्सचे लोकसभा सदस्य आगा रुहुल्लाह मेहदी आणि जम्मू आणि काश्मीरचे मंत्री सकिन इट्टूय यांनी या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली.

# भारत-पाकिस्तान युद्धाचे ढग गडद!

## ■ ७ मे रोजी देशभरात ब्लॅकआउट आणि मॉक ड्रिल;
## ■ आपत्कालीन परिस्थितीला तयार राहण्याचे राज्यांना आदेश

**नवी दिल्ली : पहलगाम दहशतवाही हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. भारत कोणत्याही क्षणी पाकिस्तानी दहशतवादाला त्याच्या भाषेत उत्तर देऊ शकतो अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने भारताच्या तीनही सेना दलांनी तयारीही पूर्ण केली आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्व राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना ७ मे रोजी मॉक ड्रिल घेण्याचे आदेश दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासन किती सज्ज आहे याची चाचणी घेण्यासाठी हा मॉक ड्रिल घेतला जाणार आहे.**



राज्यांनी पोलिस, नागरी संरक्षण यंत्रणा, आरोग्य विभाग आणि अन्य आपत्कालीन सेवांशी संबंधित यंत्रणांना तत्पर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मॉक ड्रिलमध्ये बॉम्बस्फोट, शस्त्रधारी हल्ले आणि नैसर्गिक आपत्ती यांसारख्या विविध परिस्थितींचा समावेश असणार आहे. >> पान २

# राहुल गांधी मोदींच्या भेटीला, सरन्यायाधीशही हजर

## सीमारेषेवर तणाव, दिल्लीत बैठकांची धाव

नवी दिल्ली : काँग्रेस नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधान यांच्या निवासस्थानी राहुल गांधी आणि देशाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत बैठक संपन्न झाली. एकीकडे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावग्रस्त परिस्थितीने देशात गतिमान हालचाली आहेत. त्यातच, आज विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि सीजेआय यांनी पंतप्रधान महोदयांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.




राहुल गांधी आज पंतप्रधान मोदींची भेट घेणार असल्याची माहिती होती. सीबीआयच्या प्रमुखपदी निवड करण्यासंदर्भात ही भेट होती, अशी माहिती समोर आली आहे. १४ मे २०२५ रोजी सीबीआय प्रमुख प्रवीण सूद यांचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. त्या पार्श्र्वभूमीवर पंतप्रधान, लोकसभा विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांची बैठक संपन्न झाल्याचे समजते. नव्या सीबीआय प्रमुखांच्या निवडीवर या बैठकीत शिक्कामोर्तब होईल.

दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर भारताकडून पाकिस्तानसोबत व्यापार आणि आर्थिक व्यवहारांवरुन एकप्रकारे युद्धच सुरू झालं आहे. भारताने पाकिस्तानी नागरिकांना देशातून हाकलून दिलं असून पाकिस्तानसोबतच्या जल सिंधु करारावरही बंधने घातली आहेत. दुसरीकडे तिनही सीम दलाच्या प्रमुखांशी पंतप्रधान मोदींच्या सातत्याने बैठका होत आहेत. त्यामुळे, आजच्या या बैठकीत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीवरही चर्चा होऊ शकते. या चर्चेतून मोठा निर्णय केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण, विरोधी पक्षनेते व सरन्यायाधीश यांना सोबत घेऊन पंतप्रधान मोठा निर्णय घेऊ शकतात.

## संतोष देशमुखांच्या लेकीचा बारावीचा निकाल, वैभवी देशमुखला ८५.३३ टक्के

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी** : बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची गेल्यावर्षी निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येनंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. या घटनेमुळे संतोष देशमुख यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला होता. मात्र, या कठीण परिस्थितीमध्येही संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून दाखवले आहे. बारावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल सोमवारी दुपारी जाहीर झाला. या परीक्षेत वैभवी देशमुखला ८५.३३ टक्के गुण मिळाले आहेत. संतोष देशमुख यांच्या मुलीला इंग्रजी विषयात ६३, मराठीत ८३, गणितामध्ये ९४, फिजिक्समध्ये ८३, केमेस्ट्रीत ९१ आणि बायोलॉजी विषयात ९८ गुण मिळाले आहेत. तिला एकूण ६०० पैकी ५१२ गुण मिळाले आहेत.



संतोष देशमुख यांच्या कन्येने त्यांच्या हत्येच्या दोन महिन्यानंतर डोक्यावर दु:खाचा डोंगर असताना १२ बारावीची परीक्षा दिली होती.आज वैभवीने सकाळी वडिलांच्या प्रतिमेचं दर्शन घेतलं आणि त्यांच्या पश्चात त्यांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न करत असल्याचे म्हटले. त्यांच्या आशीर्वादाने माझा निकाल चांगलाच येईल असा मला विश्वास आहे असं तिने म्हटले होते. तर आज माझे वडील माझ्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी नाहीत याचं मला दु:ख आहे, >> पान २

# महाराष्ट्रात सायबर गुन्हेगारांच्या अटकेचे प्रमाण अत्यल्प!

## पोलीस विभागाचीच माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी** : राज्याला सायबर गुन्हेगारांनी विळखा घातला असून सायबर गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यात पोलीस विभागाला अपयश आले आहे. राज्यात दाखल गुन्ह्यांच्या तुलनेत आरोपी अटकेचे प्रमाण अत्यल्प आहे. गेल्या वर्षभरात मुंबईत सर्वाधिक ७५७ सायबर गुन्हेगारांना अटक केली आहे तर दुसऱ्या स्थानावर ठाणे (१३) शहराचा क्रमांक लागतो. राज्यात जवळपास ९ हजार सायबर गुन्हे दाखल असून त्यापैकी केवळ १ हजार ७ सायबर गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे, ही माहिती पोलीस विभागाच्या संकेतस्थळावरून प्राप्त झाली आहे.

सायबर गुन्हेगारांनी अनेकांच्या खात्यातून पैसे परस्पर लंपास करणे सुरू केले आहे. सायबर गुन्हेगारीवर नियंत्रणासाठी सायबर पोलीस तसेच अद्ययावत तपास तंत्रे अस्तित्वात आली आहे. इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम (सीईआरटी), डाटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया (डीएससीआय), सायबर फॉरेन्सिक प्रयोगशाळा आदींची यासाठी स्थापना करण्यात आली. मुंबई आणि पुण्यातही या मोठमोठ्या प्रयोगशाळा अस्तित्वात आहेत. तसेच आता प्रत्येक शहरात स्वतंर्त्य सायबर पोलीस ठाणे आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात यंत्रणा तयार करूनही देशातील सायबर गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहेत.

राज्यात मुंबईत सर्वाधिक सायबर गुन्हे दाखल आहेत. मुंबईत ४८४९ सायबर गुन्हे दाखल असून ७५७ सायबर गुन्हेगारांना मुंबई पोलिसांनी अटक केली. मात्र, राज्यातील अन्य पोलीस आयुक्तालयाकडून सायबर गुन्हेगाराविरुद्ध कठोर कारवाई होताना दिसत नाही. ठाणे शहरात ६८० गुन्हे दाखल करण्यात आले असून फक्त १३ गुन्हेगारांना अटक करण्यात आली. पुणे शहरात १५०४ सायबर गुन्हे दाखल असून ९ सायबर गुन्हेगारांना अटक करण्यात आली. सर्वात शेवटच्या स्थानी नागपूर शहराचा क्रमांक लागतो. नागपुरात २१२ सायबर गुन्हे दाखल असून फक्त ५ सायबर गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे. या आकडेवारीवरून महाराष्ट्र पोलिसांचे अपयश स्पष्टपणे दिसते.

फसवणुकीचा आकडा हजारो कोटींमध्ये

डिजीटल अरेस्ट, ओटीपी-पासवर्ड विचारून फसवणूक, सेक्स्टॉर्शन, शेअर ट्रेडिंग आणि लिंक पाठवून सायबर गुन्हेगार राज्यात लूट करीत आहेत. राज्यात २०२४ मध्ये सायबर गुन्हेगारांनी ७ हजार ६३४ लाख कोटी रुपयांनी फसवणूक केली. सायबर गुन्हेगारांनी पुण्यात सहा हजार कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. तर मुंबईत ८८८ कोटी २९ लाखांनी फसवणूक झाली. ठाणे शहरात १७४ कोटी ४ लाख रुपयांनी फसवणूक करण्यात आली आहे. गृहमंर्त्याच्या नागपूर शहरात ६३



कोटी ८५ लाखांनी फसवणूक करण्यात आली.

सायबर गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी सायबर पोलीस सज्ज आहेत. सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक झाल्यास गांभीर्याने दखल घेण्यात येते. अनेक गुन्ह्यात सायबर गुन्हेगारांनी उकळलेली रक्कम पोलिसांच्या प्रयत्नाने परत मिळवण्यात यश आले आहे

CMYK

## संक्षिप्त...

### सासरच्यांना कंटाळून विवाहितेचा आत्महत्या; सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**पुसद/प्रतिनिधी :** सासरच्या लोकांच्या त्रासामुळे एका विवाहित तरुणीने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी मृत तरुणीच्या वडिलांनी केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी सासरच्या सात लोकांविरुद्ध गुन्हा दाखल केला हे घटना पुसद तालुक्याच्या शेगडी तांडा येथे घडली. सुषमा रामराव राठोड असे मृत महिलेचे नाव आहे. शेतात विहीर खोदायची आहे, त्यासाठी माहेरहून दोन लाख रुपये आणण्यासाठी सासरची मंडळी शारीरिक आणि मानसिक त्रास देत होते. अशी तक्रार मृत महिलीच्या वडिलांनी पोलिसात दिली। त्यावरून सासू सासरे यांचेसह या प्रकरनि सासरच्या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### ढाब्यावर राडा; युवकवर चाकूने प्राणघातक हल्ला

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :**यवतमाळ शहरातपासून जवळ असलेल्या किन्ही येथील हिळवळ ढाब्यावर युवकावर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आला. विजय राठोड असे जखमीचे नाव आहे. हा युवक कामानिमित्त गेला असता, ढाब्यावर असलेल्या एकाने त्याच्याशी वाद निर्माण करून चाकूने हल्ला केला. जखमी विजय राठोड याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती यवतमाळ ग्रामीण पोलिसांना देण्यात आली. ढाबा हा एका सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याचा असल्याने घटनास्थळी येण्यास टाळाटाळ करून गुन्हा दडपण्याचा प्रयत्न केला, असा नातेवाईकांचा आरोप आहे. हिळवळ ढाब्यावर अवैध दारू विक्री केली जाते. गुन्हेगारी प्रवृत्ती असलेले लोक ठिय्या मांडून राहतात. येथील प्रकार लोकांना माहिती पडू नये यासाठी सिसिटीव्ही कॅमेरे बंद करून ठेवल्याची आरोप जखमींच्या नातेवाईकांनी केला आहे.

### दुर्दैवी! पोलीस भरतीच्या सरावासाठी पहाटे उठला; कुलरचा शॉक लागून तरुणाचा जागीच मृत्यू, अकोल्यात हळहळ

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्यात कूलरचा शॉक लागून एका तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अकोल्यातल्या कान्हेरी सरप येथे ही घटना घडली आहे. रोहित विठ्ठल बावस्कर असं मृत तरुणाचं नाव आहे. १८ वर्षाचा रोहित हा दररोज पोलीस भरतीसाठी सराव करायचा. अशातच रविवारी सकाळी चार वाजता नेहमीप्रमाणे पोलीस भरतीचा सराव करण्यासाठी झोपेतून उठलेल्या रोहितला पायात बूट घालत असताना कुलरचा जबर शॉक लागलाय. त्यात रोहितचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, मागील वर्षात कुलरचा शॉप लागून जवळपास ९ जणांना मृत्यू झाला होता. या वर्षात कुलरचा शॉक लागून मृत्यू झाल्याची ही पहिली घटना समोर आली. त्यामुळे नागरिकांनी कुलर वापरताना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात येत आहे.


### मोठ्या घसरणीनंतर पुन्हा महागलं सोनं, चांदीच्या दरातही वाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अलीकडेच सोन्याच्या दरात मोठी घसरण झाली होती. मात्र त्यानंतर सातत्याने मौल्यवान धातुच्या दरात चढ-उतार होताना दिसत आहे. गेल्या तीन दिवसांपासून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या दरात वाढ होताना दिसत आहे. आजही मल्टी कमोडिटी एक्सचेंज (चउद) वर सोनं महागलं आहे. आज जवळपास १ टक्क्यांपर्यंत सोनं वधारलं आहे. गेल्या महिन्यात सोन्यात जवळपास ७ टक्क्यांपर्यंत तेजी नोंदवली होती. यामुळं गुतंवणुकदारांसमोर चांगला पर्याय उपलब्ध झाला होता.

आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या दरात मजबुती दिसत असल्याचे पाहायला मिळते. कॉमेक्सवर सोनं ३,२८० प्रति औंसवर पोहोचले आहे. ज्यामुळं आज २१ टक्क्यांची वाढ पाहायला मिळाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे चीन आणि अमेरिके यांच्यातील राजकीय तणाव आणि अमेरिकेत व्याज दरातील अनिश्चित्ता आहे. फेडरल रिझर्व्ह बँक व्याजदरात कपात करण्याची शक्यता असल्याने गुंतवणुकदरात चिंता वाढली आहे. त्यामुळं सोन्याच्या मागणीत वाढ झाली आहे. आज सोन्याच्या दरात २०० रुपयांची वाढ झाली असून २४ कॅरेट सोनं प्रतितोळा ८७,७५० रुपयांवर पोहोचलं आहे. तर, २२ कॅरेट सोन्यात २२० रुपयांची वाढ झाली असून ९५,७३० रुपये प्रतितोळा इतकी सोन्याची किंमत आहे.

दुसरीकडे चांदीच्या दरातही चढ-उतार होताना दिसत आहे. र्श्टें वर चांदीचा भाव ९३,००० प्रति किलोच्या आसपास आहे. यात देशांतर्गत बाजारात हलकी घट झाली आहे. तर, आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीच्या किंमतीत जवळपास ०.५ टक्क्यांची तेजी पाहायला मिळाली होती. कॉमेक्सवर चांदी ३३ प्रति औंसच्या जवळपास पोहोचली आहे.



# ज्येष्ठ नेत्याला अशी उपमा देणे अयोग्य

## मंत्री हसन मुश्रीफ यांचे पत्रकार परिषदेत व्यक्त केले मत

दैनिक आपला विदर्भ

**ोल्हापूर/प्रतिनिधी :** प्रत्येक कार्यकर्त्याला वाटत असत, आपला नेता पुढे जावा, वस्तुस्थिती ज्यावेळेस प्रत्यक्षात येईल त्यावेळेसच ह्या गोष्टी घडणार आहेत. संजय शिरसाट यांनी केलेलं वक्तव्य चुकीचे आहे. ते माझे चांगले मित्र आहेत, मात्र ते नव्याने मंत्री झाले आहेत. ज्यावेळेस ही घटना घडली असं त्यांना वाटलं तेव्हा वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांना घेऊन त्यांनी बसयला हवं होतं. वस्तुस्थिती त्यांनी समजून घ्यायला हवी.यातून जर त्यांचं समाधान झालं नाही, तर ते मुख्यमंत्र्यांना भेटू शकले असते. कोणतीही माहिती न घेता प्रसार माध्यमांसमोर येणं आणि आपल्याच ज्येष्ठ नेत्याला अशी उपमा देणं हे अयोग्य आहे. असे मत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

पत्रकार परिषदेत वैद्यकीय शिक्षण मंत्री असं म्हणाले की, अजित पवार काय आकाशातून पैसे आणणार आहेत का? हे पैसे अजित पवारांनी घरी नेले नाहीत. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच ही लाडकी बहीण योजना यशस्वी झाली आहे. याचा आवाका इतका मोठा आहे की, पैसे देताना ओढाताण होत आहे. आपण सर्वांनी मिळून दिलेलं आश्वासन पूर्ण करण्यासाठी हे पैसे वापरले असतील. तर, यात अशा उपमा वापरणं बरोबर नाही.असे विधान करण्यापूर्वी आधी आपण शहानिशा करायला पाहिजे,



असा माझा संजय शिरसाठ यांना सल्ला आहे.२३६ महायुतीच्या जागा निवडून आलेल्या आहेत, आणि विरोधकांच्या फार कमी आहेत. आता अनेकजण सत्ताधारी पक्षासोबत येण्यासाठी इच्छुक आहेत.विरोधी पक्षाचे लोक आमच्याकडे येण्यासाठी चढाओढ लागली आहे,हे खरं आहे.राज्याचे मुख्यमंत्री आता देवेंद्र फडणवीस झाले आहेत. आमच्याकडे भक्कम बहुमत आहे.आमचे तिन्ही नेते मोठ्या मनाचे आहेत.लोकांची कामं करणं आणि विकास करणं याकडे लक्ष देणं याकडे प्राधान्यच आहे.विनायक राऊत ऑफर याबाबत विरोधकांनी काय बोलावं हे त्यांचा प्रश्न आहे.

मविआबद्दल तिन्ही पक्षांमध्ये सत्ता नसल्याने तेथील आमदार हवालदिल झाल्याचे दिसत आहेत. यापूर्वी देखील अजित पवारांनी अशा पद्धतीचे वक्तव्य केले होते. त्यांनी कर्जमाफी करणार नाही, असं म्हटलेलं नाही. योग्य वेळेला कर्जमाफी होणार आणि योग्य वेळेलाच २१०० रुपये लाडक्या बहिणीला देणार. विरोधकांकडे आता बोलण्याशिवाय काय राहिला आहे. पुढील पाच वर्ष त्यांना बोलण्याशिवाय दुसरा व्यवसाय राहिला नाही. लाडक्या बहिणीनी विरोधकांना असा झटका दिला आहे की, स्वप्नात सुद्धा त्यांना त्या लाडक्या बहिणी दिसू लागलेल्या आहेत. त्यांच्या मनामध्ये किती चीड निर्माण झाली आहे दिसत आहे. अलमट्टी धरणाची उंची वाढवू नये, हे कोल्हापूर सांगली ची इच्छा आहे. गेले अनेक वर्ष कोल्हापूरला वारंवार पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही, हे ऐकून वाईट वाटतं. मी पालकमंत्री नसल्याने आता बैठक घेऊ शकलो नाही.मात्र फोन करून सांगितलेला आहे की परिस्थिती बरोबर नाही. असे मत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

### बोरिवलीहून कोकणात निघालेल्या खासगी बसला अपघात, दोघांचा मृत्यू

**खेड/प्रतिनिधी :** मुंबईतील बोरिवलीहून कोकणच्या दिशेने निघालेल्या ओमकार ट्रॅव्हलच्या खासगी बसला मुंबई गोवा महामार्गावर पनवेल तालुक्यातील कर्नाळा खिंड परिसरात रविवारी अकरा वाजता अपघात झाला. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला आणि ३० पेक्षा प्रवासी जखमी झाले.ओमकार ट्रॅव्हल्सची एमएच ४७, वाय ७४८७ ही खासगी बस पस्तीस प्रवासी घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे निघाली होती. चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे बस उटलली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दलाची रेस्क्यू टीम, वैद्यकीय पथक आणि स्थानिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. अपघातामुळे मुंबई गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी झाली. जखमींना कळंबोली येथील एमजीएम रुग्णालय आणि पनवेल येथील गांधी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## पाकिस्तानला उत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सक्षम आहेत




दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पाकिस्तानला उत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सक्षम आहेत. यावेळी ठोस उत्तर दिले जाईल. हिंदू सकल समाजाचा मोर्चा निघाला आहे. जिहादी प्रवृत्तीला प्रत्युत्तर दिले जाईल. असे टीका मत्स्योद्योग आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी बोलताना केली. मत्स्य खात्यात गोड्या पाण्यातील तलावातील मासेमारी संदर्भात बैठक पार पडली आहे.गाळ कसा काढायचा यावर चर्चा झाली. पुण्यात मोठे मत्स्यालय सुरू करण्याची योजना आहे.हडपसरमध्ये जागा उपलब्ध आहे.उत्पन्न वाढवण्यासाठी उपाययोजना गरजेच्या आहेत.सध्या अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. मत्स्य शेतीविषयी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.पुढील आर्थिक वर्षात यामध्ये बदल दिसून येणार आहेत. सांगली, कोल्हापूरमध्ये उत्पादन कमी; साताऱ्यात ठीक आहे.पुण्यात मागील वर्षाच्या तुलनेत उत्पादन घटले आहे. उजनी धरणासारख्या ठिकाणी मत्स्य उत्पादनावर परिणाम झाला आहे. जलसंपदा खात्याकडून मत्स्य खात्याकडे नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. मत्स्य शेती करणाऱ्यांच्या आर्थिक वृद्धीसाठी प्रयत्न केले जात आहे. दूषित पाण्यामुळे समस्या असल्यास कारवाई सुरू केली आहे. बंदर खात्याच्या अपयशावर उपाययोजना आखणार आहे.एआय तंत्रज्ञानाचा वापर मत्स्य व्यवसायात होणार आहे.राज्यात उद्योग येणे आवश्यक; केमिकलमुळे नुकसान होत असल्यास, उपाययोजना गरजेची आहे.मंत्री म्हणून संपूर्ण नियोजन करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. पाकिस्तानला उत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सक्षम आहेत. यावेळी ठोस उत्तर दिले जाईल. हिंदू सकल समाजाचा मोर्चा निघाला आहे.जिहादी प्रवृत्तीला प्रत्युत्तर दिले जाईल. ''देवाभाऊंचे सरकार आहे'' जनतेचा विश्वास आहे. विरोधकांच्या विचारसरणीवर टीका ही त्याच्या बापाचे विचार काय आहेत, त्यावरून कळते. हिंदूंनी सत्तेत बसवले असल्यामुळे जबाबदारी स्वीकारली आहे. कोरोनाच्या काळात राज्य क्रमांक एक अशी टीका ठाकरे सरकारवर मत्स्योद्योग आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

**मंत्री नितेश राणे यांचा विरोधकांना टोला**

## दुर्दैवाने १०० वर्षात राज्यात फार काही क्रांती झालेली दिसत नाही : खासदार सुप्रिया सुळे

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** दुर्दैवाने १०० वर्षात राज्यात फार काही क्रांती झालेली दिसत नाही. असा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना केला. तसेच हा डेटा माझा नाही, हा केंद्र आणि राज्य सरकारचा डेटा असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. त्या पुढे म्हणाल्या की, पीएमआरडीएचे दोन तीन मुद्दे प्रलंबित आहेत. बनेश्वर रस्ता विलंबित राहिला आहे. त्यांनी काही तांत्रिक अडचणी सांगितल्या.२० मेपर्यंत काम सुरू झालं नाही, तर रोजगार हमी योजनेतून काम सुरू करणार आहे.स्वतः रोजगार हमी योजनेचे कार्ड काढणार आहे. सरकार कडून पैसे घेणार नाही, पण मोफत काम करण्याची परवानगी मी सरकारकडे मागणार आहे. रोजगार हमी योजनेत काम करतात. तसेच सगळे तिकडे फावडे घेऊन जाणार आहेत. २३ मे पासून स्वतःच रस्ता काम सुरू करायला घेणार आहे. पीएमआरडीएचा हवेली तालुक्यातील रिंग रोड चालला आहे. यामध्ये अनेक लोकांची घरे जात आहेत. स्थानिक कष्ट करणाऱ्या लोकांनी लोन काढून ती घर बांधलेली आहेत. आमची विनंती आहे.फक्त २०० मीटर अलाइनमेंट बदला.आमचा रिंग रोडला विरोध नाही, विकास हा झालाच पाहिजे असे आमचे मत आहे. आमचा आग्रह राहील कि, रिंग रोड व्हावा – मात्र आमची विनम्र विनंती आहे. की, गरीब कष्ट करणाऱ्या लोकांच्या घरावरून रस्ता काढू नये, हिंजवडीलची ट्राफिक होतं, त्यामुळे अनेक रस्ते रखडलेले आहेत. यावर छोटे छोटे सोल्युशन्स आहेत. डीपी रखडल्यामुळे अजून पुढे उशिराने होणार आहे. ट्राफिक ची समस्या पुणेकरांना प्रचंड त्रास देत आहे. आमची पीएमआरडी आणि पीएमसीला विनंती आहे की, त्यांनी एकत्र येऊन हे काम करावे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला कुठेही जायचा हक्क आहे. मात्र, ज्या पद्धतीने ईडी, सीबीआय महाराष्ट्रात हे राजकारण चाललंय ते दुर्दैवी आहे. याला लोकशाही म्हणत नाहीत, याला दडपशाही म्हणतात.महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती अडचणीत आहे. सरकारच काम बघा अनेक पेमेंट्स अडचणीत आले आहेत. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी किंवा निदान मालाला हमीभाव व्यवस्थित मिळत नाही आहे. महाराष्ट्रात क्राईम वाढत आहे. दुर्दैवाने १०० वर्षात राज्यात फार काही क्रांती झालेली दिसत नाही. हा डेटा माझा नाही, हा केंद्र आणि राज्य सरकारचा डेटा आहे.महाराष्ट्र सरकारने या सगळ्या प्रक्रियेबद्दल त्यांचं काय स्टॅन्ड आहे, आणि वास्तव काय आहे, हे पारदर्शकपणे जनतेला सांगावे. जे सरकार मध्ये आहे, त्यांनी यावर उत्तर द्यायला हवे. महाविकास आघाडीकडून अजित पवार यांना मुख्यमंत्री पद ऑफर दिली जात आहे.याबाबतीत गेल्या तीन चार दिवसात भारतीय पक्षाकडून सुद्धा स्टेटमेंट झाली आहेत. सशक्त लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार असतो. पाकिस्तान विरुद्ध ॲक्शन घेणे गरजेचे आहे.असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



# प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजना; जिल्ह्यात 'मॉडेल सोलर व्हिलेज' ची निवड होणार : जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील

## १ कोटी रूपयाचे केंद्रीय अर्थ सहाय्य मिळणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील प्रत्येक घर, समुदायांना ऊर्जा स्वावलंबी बनविणे, सौरऊर्जेचा वापर वाढविणे आणि पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोतांचा प्रसार करण्यासाठी जिल्ह्यात महावितरण प्रधानमंत्री सुर्यघर मोफत याजना राबविण्यात येत आहे.या योजनेअंतर्ग शंभर टक्के सौर प्रकल्प स्थापन करण्यात आलेल्या गावांमधून स्पर्धात्मक पध्दतिने एका ''मॉडेल सोलर व्हिलेज'' ची निवड होणार असून ,निवड करण्यात आलेल्या या मॉडेल सोलार व्हिलेजला केंद्रशासनाचे १ कोटी रूपयाचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दिली आहे.

महावितरणच्या माध्यमातून राज्यात प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजना राबविण्यात येत आहे.



या योजनेअंतर्गत ''मॉडेल सोलर व्हिलेज'' उपक्रमाची अंमलबजावणी राज्यासह देशभरात सुरू झाली आहे. या उपक्रमाचा उद्देश प्रत्येक जिल्ह्यात एक गाव निवडून त्यास सौरऊर्जेवर आधारित, ऊर्जा स्वावलंबी मॉडेल व्हिलेजमध्ये रूपांतरित करणे आहे.

मॉडेल सोलर व्हिलेजची निवड जिल्हास्तरीय समितीव्दारे स्पर्धात्मक पध्दतीने करण्यात येणार आहे.उमेदवार गाव म्हणून पात्र होण्यासाठी जिल्ह्यात ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेले महसूल गाव असणे आवश्यक आहे. जिल्हास्तरीय समितीव्दारे सहा महिन्यांनी स्पर्धेतील गावांची एकूण वितरित अक्षय ऊर्जा () क्षमतेवर मूल्यांकन केले जाणार आहे आणि सर्वाधिक आरई क्षमता असलेल्या गावाची मॉडेल सोलर व्हिलेज म्हणून निवड केली जाणार आहे.



जिल्हा समितीव्दारे निवड करण्यात आलेल्या ''मॉडेल सोलर व्हिलेजला'' १ कोटी रूपयाचे केंद्रीय आर्थिक सहाय्य अनुदान मिळेल. प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेची राज्यात अंमलबाजाणी करण्याची जबाबदारी महावितरणची असल्याने महावितरण आणि सोलर व्हिलेज स्थापन करण्यासाठी तयार करण्यात आलेली जिल्हा समितीच्या देखरेखीखाली मॉडेल गावांचे यशस्वीपणे सौरऊर्जेकडे संक्रमण होईल आणि देशभरातील इतरांसाठी बेंचमार्क सेट होईल.

# सैनिक सुनील नागरे यांचा अपघाती मृत्यू

## हजारोंच्या जनसमुदायाने दिला अश्रु नयनाने अखेरचा निरोप

### अमर रहे अमर रहे सुनिल नागरे अमर रहे अशा गगनभेदी घोषणांनी आसमंत दणाणला





**दैनिक आपला विदर्भ**

■ देवानंद सानप

**लोणार :** जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील अति दुर्गम भागातील गंधारी गावचे सुपुत्र सैनिक सुनिल अंबादास नागरे यांनी बारा वर्षापासून देशसेवा करीत आहेत. दोन दिवसांपूर्वी मुळगाव गंधारी येथे येण्यासाठी निघाले असताना मध्यप्रदेशातील नार्सीपूर रेल्वे स्टेशन येथे त्यांचा अपघाती मृत्यू झाला. या घटनेने गावात एकच शोककळा पसरली असून देशभक्त सुनील नागरे यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी उपस्थित जनसमुदायांनी अमर रहे, अमर रहे,सुनील नागरे अमर रहे च्या गगनभेदी घोषणा देत मोठ्या जड अंतकरणाने सैनिक सुनील नागरे यांना अखेरचा निरोप दिला. सैनिक सुनील नागरे हे लोणार तालुक्यातील अतिदुर्गम भागातील गंधारी या गावचे सुपुत्र होते बारा वर्षांपूर्वी सुनील नागरे भारतीय सैन्य दलात दाखल झाले होते बारा वर्ष सेवा देत असताना ते सुट्टीवर मूळ गावी गंधारी येते येण्यासाठी दोन दिवसापूर्वी निघाले होते गावाकडे येत असताना मध्यप्रदेशातील नारसेपुर रेल्वे स्टेशन येथे त्यांचा अपघाती मृत्यू झाला. ते सैन्य भरतीसाठी गावतील तरुणांना मार्गदर्शन करीत होते.

दोन दिवसा पूर्वी आपल्या मुळ गावी गंधारी येथे येत आसता मध्यप्रदेश येथील नार्सिपुर रेल्वे स्टेशनवर अपघाती मृत्यू झाला. आज मुळ गावी गंधारी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात पत्नी माधुरी, एक मुलगा, एक मुलगी, आई वडील असा परिवार आहे. यावेळी विधानसभा विधायक सिध्दार्थ खरात, नायब तहसीलदार मयूर इप्पर, मंडळ अधिकारी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील बहुसंख्येने नागरीकांनी मानवंदना दिली.

## रिसोड तालुक्यात विजेच्या गडगडाटासह व वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

**रिसोड/प्रतिनिधी :**शहर व तालुक्यात विजेच्या गडगडाटासह व वादळी वाऱ्यासह पाऊस झाला अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाली वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे आंबा व भाजीपाला पिकाची मोठे नुकसान झाले आहे. मागील महिन्याभरापासून तापमानाने उच्चांक गाठला होता तापमान ४२ डिग्री सेल्सिअस पर्यंत पोहोचले होते नागरिक उकाड्याने हैराण झाले होते आज दिनांक पाच मे रोजी सकाळपासूनच दमट व ढगाळ वातावरण होते दुपारी उष्णता मनातही प्रचंड वाढ झाली होती त्यातच दुपारनंतर आकाशात एकाएकी ढग दाटून आले व ठीक चार वाजता अचानक पावसाला सुरुवात झाली विजेच्या गडगडाटासह व वादळी वाऱ्यासह एक तास पाऊस पडला असून अचानक एकाएकी पावसाला सुरुवात झाल्यामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाली वादळी वाऱ्यामुळे आंबा व भाजीपाला पिकाचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे पावसामुळे वातावरणामध्ये काही काळ गारवा निर्माण झाला आहे.

## श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय रिसोडच्या विद्यार्थ्यांचे सुयश !

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ चा निकाल दि ५ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला असून, यामध्ये श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड च्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे. या कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी कला, उर्दू कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकूण २५५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. यापैकी २४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९७.२५ % इतका लागला आहे. यामध्ये विज्ञान शाखेतुन कुमारी साक्षी पंढरी तिखे ही ८०.८३ % गुण मिळवुन प्रथम आली, तर विज्ञान शाखेतून कु. धनश्री विश्वास कातुरे ८०.०० % द्वितीय, कु. अनिषा अनिलराव सरनाईक व कु. मनीषा भिमराव इंगळे ह्या विद्यार्थीनी ७८.१७% तृतीय आल्या आहेत. वाणिज्य शाखे मधून प्रथम कु.जया गणेश हटकर ७४.१७%, द्वितीय ज्ञानेश्वर भारत तांबिले ७१.१७ % तर तृतीय हर्षल सुनील लोमटे ७०.६७ % आला आहे. कला शाखा (उर्दू) मधून कु. हुमा परविन इमरोज खान ७७.८३ % प्रथम, कु. मुस्कान परवीन शेख गफूर ६४.३३ % द्वितीय, व कु. अशमिरा बी शेख हमीद ६३.६७ % तृतीय आली आहे. कला शाखा (मराठी) मधून रामेश्वर प्रकाश गोरे ८२.६७ % गुण घेऊन प्रथम आला आहे. शिवतीर्थ मोतीराम पवनकर ७७.१७ % द्वितीय व कु. प्रतीक्षा रुपराव खंडागळे ७७.०० % गुणासह तृतीय आली आहे. या कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण २५५ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी १४ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले.११९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत तर १०९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व १५ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष तथा शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय रिसोड चे शाळा समिती संचालक पंजाबराव देशमुख, जितेंद्रकुमार दलाल, संजयकुमार जीरवणकर, प्राचार्य संजयराव देशमुख, उपमुख्याध्यापक श्री संजयराव नरवाडे, पर्यवेक्षक गजाननराव भिसडे यांनी अभिनंदन केले आहे.

## मुक्या प्राण्यांसाठी पिंगलाक्षी देवी परिसरात पाण्याची सुविधा

### नवचेतना ग्रुपचा स्तुत्य उपक्रम




**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** शहरातील नवचेतना ग्रुप नेहमीच समाजोपयोगी आणि सकारात्मक कार्यात अग्रेसर असून, याच धर्तीवर मुक्या जनावरांसह पक्षी आणि इतर प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. नवचेतना ग्रुपचे प्रमुख विनोद बांगर यांच्या संकल्पनेतून प्रेरित होऊन शहरातील समाजसेवक भारत कोकाटे यांनी स्वतःच्या खर्चातून रिसोड शहरालगत असलेल्या पिंगलाक्षी देवी परिसरात मुक्या प्राणी आणि पक्ष्यांसाठी पाण्याच्या हौदाची व्यवस्था केली. या पाण्याच्या हौदाचे उद्घाटन पत्रकार संघाचे प्रमुख तथा पिंगळाक्षी देवी संस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संतोष वाघमारे व गणेश भारत कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पत्रकार जयंत वसमतकर, गजानन बानोरे, पक्षीप्रेमी मुलंगे अण्णा, पत्रकार केशव गरकळ, नवचेतना ग्रुपचे प्रमुख विनोद बांगर व सदस्य संतोष हाडे, सागर बांगर, ओम तूपसुंदर, गणेश कांबळे, लहुजी बांगर, सुरेश हौदावाले तसेच नवचेतना ग्रुपचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी संतोष वाघमारे, जयंत वसमतकर आणि गजानन बानोरे यांनी नवचेतना ग्रुपच्या सकारात्मक उपक्रमाचे कौतुक करत सखोल मार्गदर्शन केले.

## बिबीसह परिसरात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस

### लग्न मंडपात वऱ्हाडांची धावपळ

**दैनिक आपला विदर्भ**

■ देवानंद सानप



**लोणार :** तालुक्यातील बिबीसह परिसरात दुपारी तीन वाजता अचानक वातावरणात बदल होऊन वादळी वारा पाऊस आणि गारा पडल्याने अनेक ठिकाणी लग्न मंडपा वऱ्हाडांची एकच धावपळ उडाली. अचानक आलेल्य वादळी वारा व पावसाने वधू वराकडील मंडळीचा हिरमोड झाला. तर, हजारो रुपये खर्च करून करण्यात आलेला स्वयंपाक हा वादळी वाऱ्याने खराब झाला आहे.

५ में रोजी लग्नाची दाट तिथ असल्याने अनेकांची लगीन घाई सुरू होती. गावागावात वराडी पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी व त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी जय तयारी करण्यात आली होती. अनेक ठिकाणी लग्न मंडप उभारले होते. एन जेवणाच्या वेळी पाऊस आणि गारा पडल्याने अनेकांची धावपळ झाली. त्याचबरोबर परिसरातील शेतातील कांदा , ज्वारी, भाजीपाला, फळपिकासह उन्हाळी पिकांचे नुकसान झाले.

दुपारपर्यंत वातावरण निरभ्र असताना दुपारी तीन वाजता अचानक आकाशात ढग दाटून आले व लगेच वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू झाला. काही ठिकाणी गारा पडल्यात त्यामुळे नागरिकांचे एकच धांदल उडाली. लग्न सराईचे दिवस असल्याने वधू वराकडील मंडळीचीही एकच धांदल उडाली. हजारो रुपयाचा खर्च करून गावागावात वऱ्हडी मंडळीसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

मात्र, ऐन जेवणाच्या वेळेलाच वादळी वारा आल्याने व पंगतीमध्ये या बसलेल्या पाहुणे मंडळीच्या ताटावरील धुळ उडाल्याने जेवणाची ही मोठी पंचायत पाहुणेमंडळीची झाली. तर, हजारो रुपये खर्च करून केलेला स्वयंपाक वाया गेला. त्यामुळे वधू वराकडील मंडळीचा हिरमोड झाला. तर, पाहुणेमंडळीनाही उपाशीपोटी गावी परत जावे लागले. एकंदरीत वादळी वाऱ्याने लग्नसराईतील पाहुणे मंडळींची धांदल घाई झाली.तर, शेतातील उन्हाळी पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

---

## विविध वृत्त...

### रखरखत्या उन्हात शिवसेनेच्या नेतृत्वात महिलांचा नांदगाव नगर पंचायतवर धडकला घागर मोर्चा



**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्याच्या नांदगाव शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या चांदी प्रकल्पात मुबलक पाणी साठा असतांना सुद्धा नगर पंचायतचे नियोजना अभावी १० ते १५ दिवसाआड पाणी पुरवठा केला जात असल्याने भीषण पाणी टंचाईच्या झळा नागरिकांना बसत आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेकडो महिलांनी नगर पंचायत कार्यालयावर घागर मोर्चा काढून मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांना घेराव करुन कार्यालयातच घागरी फोडून महिलांनी संताप व्यक्त करत नियमित पाणी पुरवठा करण्याच्या मागणीसाठी घाघर मोर्चा काढण्यात आला.

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मनसेच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांचे ठिय्या आंदोलन




**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** अचलपूर तालुक्यातील असदपुर ते येवदा रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांच्या वतीने आमची शाळा पालकमंत्र्याच्या दारी या मथळ्या मनसेच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. अचलपूर तालुक्यातील असदपुर ते येवदा रस्त्याची अवस्था ही दयनीय झाली आहे.रस्ता खराब असल्याने एसटीची सेवा बंद झाली आहे.परिणामी विद्यार्थ्यांच शैक्षणिक नुकसान होत आहे. पालकमंत्री साहेब निधी द्या, पालकमंत्री साहेब रस्ता द्या, अशा आशयाचे पोस्टर घेऊन विद्यार्थी आंदोलनाला बसले. यापूर्वी अनेकदा आंदोलन करून निवेदन देऊनही रस्त्याचे काम न झाल्याने विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.अचलपूर तालुक्यातील रस्त्यासाठी विद्यार्थ्यांना आंदोलन करण्याची दुर्दैवी वेळ विद्यार्थ्यांवर आली आहे.अशी माहिती विद्यार्थी ईश्वरी गावंडे, शितीला बारबुदे व अचलपूर मनसे अध्यक्ष पुरुषोत्तम काळे यांनी दिली आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) गटाकडून नगरपरिषद वर घागर मोर्चा



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मागील पंधरा दिवसांपासून बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहराला होत असलेला पाणीपुरवठा हा दूषित असून यामुळे डायरिया – मलेरिया सारखे संसर्गजन्य आजारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. मान्सून सुरू होत. असतानाही अजून पर्यंत शहरातल्या नाल्या त्यांची साफसफाई न झाल्याने त्या तुडुंब भरलेल्या आहेत. मलकापूर नगरपालिकेत कर आकारणी सोबत मासिक दोन टक्के शास्ती रक्कम आकारण्यात येत आहे. व ही अवैध सावकारी सारखे असल्यामुळे ते त्वरित रद्द करण्यात यावी.

पंतप्रधान आवास योजनेत लाभार्थ्यांना अजूनही अनुदान मिळालेले नसल्यामुळे ते त्वरित देण्यात यावे. अशा विविध मागण्यांकरिता आज मलकापूर येथील महिला घागर घेऊन व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे पदाधिकारी चक्क मलकापूर नगरपरिषद वर हल्लाबोल करीत तेथे मुख्याधिकारी व प्रशासक यांच्या समोर घागरी फोडण्यात येऊन प्रशासनाचा निषेध करण्यात आला. नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा, महिन्यात चार ते पाच वेळा पाणी देऊन संपूर्ण महिन्याची पानिपट्टी – हा अन्याय बंद करण्यात यावा. अशी मागणी आंदोलन करतानी केली आहे.